नियमित दिवाणी दावा क्र. ४८/२०२४
*(भास्कर सोनवणे वि. प्रकाश आहेर व इतर)*
*CNR No.* MHNS240004372024

## निशाणी क्र.२३ खालील आदेश

१. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज त्यांच्याविरुध्द झालेला म्हणणे नाही/विनाकैफियत चा आदेश रद्‌दबातल करण्याकरिता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी चे कथन की, वादी यांनी प्रस्तुत दावा जाहीरनामा आणि निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी हजर झाले परंतु प्रतिवादी क्र.१ यांना दमा, बी.पी व हृदय विकाराचा त्रास असल्याने त्यांना नियमित औषधोपचार, चाचण्या करण्यासाठी वारंवार शहरात मोठ्या दवाखान्यात जावे लागते. प्रतिवादी क्र.१ हे आजारी असल्यामुळे त्यांना कागदपत्र जमविण्याकरिता बाहेर जाणे शक्य होत नव्हते व त्यामुळे ते त्यांच्या वकिलांना दाव्यासंदर्भातील माहिती देवु शकले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द विनाकैफियत/म्हणणे नाही चा आदेश पारित करण्यात आलेला आहे. तरी प्रतिवादी यांच्याविरुध्द झालेला विनाकैफियत/विना म्हणणे चा आदेश रद्‌दबातल होवुन मिळावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे. सदरची परवानगी न दिल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करावी अशी विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले व प्रतिवादीच्या अर्जातील संपुर्ण कथने नाकारली. वादी यांचे कथन की, प्रतिवादी यांनी मुद्‌दामहुन

त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. तसेच त्यांनी जबाब देण्यास का विलंब झाला याचे कारण नमुद केलेले नाही. करिता प्रतिवादी यांचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादींच्या वकिलांचे म्हणणे ऐकले. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुत दावा जाहीरनामा आणि निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये त्यांचे म्हणणे सादर करण्याची विनंती केली आहे. सदर अर्जाचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र.१ यांना दमा, बी.पी व हृदय विकाराचा त्रास असल्याने त्यांना नियमित औषधोपचार, चाचण्या करण्यासाठी वारंवार शहरात मोठ्या दवाखान्यात जावे लागते, तसेच ते आजारी असल्यामुळे त्यांना कागदपत्र जमविण्याकरिता बाहेर जाणे शक्य होत नव्हते व त्यामुळे ते त्यांच्या वकिलांना दाव्यासंदर्भातील माहिती देवु शकले नाही, हे त्यांचे म्हणणे सिध्द करण्यासाठी त्यांनी कुठलाही पुरावा किंवा दस्त अभिलेखावर दाखल केला नाही. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणण्याच्या पुष्ठ्यार्थ स्वतः चे प्रतिज्ञापत्र दिलेले आहे. सदर प्रकरण गुणवत्तेवर चालविण्याकरिता प्रत्येक पक्षकाराला समान संधी मिळणे कायद्याने गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी दिल्यास कोणत्याही पक्षाचे नुकसान होणार नाही. उलट न्यायदान करण्यास मदत होईल. परंतु सदर प्रकरणात झालेला विलंब पाहता तो भरुन काढण्यासाठी सदर अर्जात योग्य तो दंड आकरुन मंजुर करणे योग्य राहिल. करिता प्रकरणाचे स्वरुप बघता व स्थिती बघता मी खालीलप्रमाणे आदेश पारित

करत आहे :—

## आदेश

१. प्रतिवादी क्र. २३ यांचा प्रस्तुत अर्ज रक्कम रु.५००/— दंड लावुन मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर दंडाची रक्कम तालुका विधी सेवा प्रधिकरण, सटाणा यांना आज किंवा पुढील तारखेत देण्याचे आदेशित करण्यात येते.

३. प्रतिवादी यांनी वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर त्यांचे लेखी म्हणणे/कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

PRIYANKA HARISH AHIRE

Digitally signed by PRIYANKA HARISH AHIRE
Date: 2025.04.09 12:21:56 +0530

दिनांक :—०८/०४/२०२५

(पी. एच. अहिरे)
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, सटाणा.

## CERTIFICATE

I certify that the contents of this PDF File are word to word as per Original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Akash P. Sonawane |
| Name of the Court | : | 2nd Jt. Civil Court (J.D.), Satana. |
| Date of Decision | : | 08.04.2025. |
| PDF Uploading Date | : | 08.04.2025. |

*Sd/-*
Stenographer